# महाराष्ट्र विधानसभा

## पहिले अधिवेशन, २०१६

---

## तारांकित प्रश्नोत्तरांची यादी

**बुधवार, दिनांक ०६ एप्रिल, २०१६ / चैत्र १७, १९३८ ( शके )**

| | |
|---|---|
| **(१) वित्त आणि नियोजन, वने मंत्री**<br>**(२) ग्रामविकास आणि जलसंधारण, रोजगार हमी योजना, महिला व बाल विकास मंत्री**<br>**(३) जलसंपदा मंत्री**<br>**(४) सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** | **यांचे प्रभारी विभाग** |

---

**प्रश्नांची एकूण संख्या - ३८**

---

### धरणगांव ते नरवेल (ता.मलकापूर, जि.बुलढाणा) रस्त्याला जोडणाऱ्या धोंगर्डी पोचमार्गाची झालेली दुरवस्था

**(१) * ४८४७४ श्री.चैनसुख संचेती (मलकापूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मलकापूर मतदार संघातील प्रजीमा ९ ला जोडणारा धोंगर्डी पोचमार्ग ह्या एकूण १.३० कि.मी. लांबीच्या रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे दुचाकी, चारचाकी वाहन धारकांना, शेतकरी व ग्रामस्थांना गैरसोयीचे झाले असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर रस्त्याचे मातीकाम व खडीकरण करण्यासाठी २५ लक्ष रुपयांच्या निधीची आवश्यकता असून, याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी वेळोवेळी कार्यकारी अभियंता, जिल्हा परिषद बांधकाम विभाग, बुलढाणा यांना सूचित केले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या रस्त्याच्या दुरुस्तीबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) स्थानिक लोकप्रतिनिधींनी तोंडी मागणी केलेली आहे.

(३) व (४) मलकापुर मतदारसंघातील धरणगांव ते नरवेल या प्रजिमा ९ ला जोडणारा धोंगर्डी पोचमार्ग हा ग्रामीण मार्ग क्र. ४० दर्जाचा रस्ता असून त्याची एकूण लांबी ३.५० कि.मी. आहे. सदर रस्त्याच्या ०/०० ते १/९०० कि.मी. लांबीचे रस्त्याच्या मजबुतीकरण व खडीकरणाचे काम मार्च २०१५ अखेर पूर्ण करण्यात आले आहे.

प्रश्नांकित १/९०० ते २/९०० या १ कि.मी. लांबीतील मजबुतीकरणासह मुरुमीकरणाचे काम स्थानिक लोकप्रतिनिधी यांच्या मागणीनुसार सन २०१५-१६ या आर्थिक वर्षासाठी जिल्हा वार्षिक योजनेमधून मंजूर असून निविदा स्तरावर आहे.

उर्वरीत २/९०० ते ३/५०० कि.मी. लांबीतील रस्त्याचे काम जिल्हा परिषदेला विविध योजनेमधून प्राप्त निधी व निकषाच्या अधिन राहून सन २०१६-१७ मध्ये प्रस्तावित करण्याचे जिल्हा परिषदेचे नियोजन आहे.

-----------------

## पागोरी पिंपळगाव (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील वसुंधरा पाणलोट समितीच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२) * ४५७५५ श्री.विजय औटी (पारनेर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पागोरी पिंपळगाव (ता.पाथर्डी, जि.अहमदनगर) येथील वसुंधरा पाणलोट समितीच्या कामातील गैरव्यवहाराची चौकशी करण्यासाठी कृषी विभागाचे मंडळ अधिकारी यांच्या अध्यक्षतेखाली समितीची नेमणूक करण्यात आली असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, समितीने चौकशी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीनुसार दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२), (३) व (४) मंडळ कृषि अधिकारी, करंजी हे दि.१४/१/२०१६ रोजी चौकशीकरीता गेले असता सदर गावातील ग्रामस्थांनी तणावपूर्ण परिस्थिती निर्माण केल्याने चौकशी झाली नाही. आता सदर चौकशी करण्याकरीता तालुका कृषि अधिकारी यांना आदेशीत करण्यात येत आहे.

-----------------

**ठाणे जिल्ह्यातील शाई व काळू धरणांची कामे अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(३) * ४१९२७ श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) ठाणे जिल्ह्यातील दिवसेंदिवस वाढत चाललेल्या शहरीकरणाबरोबरच वाढत्या लोकसंख्येच्या पाण्याची समस्या सोडविण्यासाठी प्रस्तावित करण्यात आलेल्या शाई व काळू धरणांची कामे अद्यापही अपूर्णावस्थेत असल्याची माहिती माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात निदर्शनास आलेली आहे, हे खरे आहे काय,

(२) तसेच ठाणे जिल्ह्यातील पाण्याची समस्या सोडविण्याबाबत व जिल्ह्यातील भविष्यात वाढणारी पाण्याची मागणी यासंदर्भात मा.जलसंपदा मंत्री व मा.पालकमंत्री ठाणे जिल्हा यांच्यासमवेत दिनांक ३ मार्च, २०१६ रोजी वा त्यासुमारास बैठकही आयोजित करण्यात आली होती, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने चौकशी केली आहे काय व चौकशीत काय आढळून आले,

(४) असल्यास, चौकशीनुसार ठाणे जिल्ह्यातील पाण्याची समस्या सोडविण्यासाठी धरणांची कामे लवकरात लवकर पूर्ण करण्यासंदर्भात शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) हे अंशत: खरे आहे.

काळू धरणाचे काम मा.उच्च न्यायालयाच्या आदेशान्वये १/३/२०१२ पासून बंद आहे. शाई प्रकल्पाच्या भूसंपदानास स्थानिकांचा तीव्र विरोध असल्याने अद्याप चालू करता आलेले नाही.

(२) होय.

(३) व (४) शाई प्रकल्पास प्रकल्पबाधित शेतकऱ्यांचा तीव्र विरोध असल्याने भूसंपादन प्रक्रिया अद्याप सुरु झालेली नाही. तसेच मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने काळू धरणाचे काम पूर्ण झालेशिवाय शाई धरणाचे काम हाती घेऊन नये असे कळविलेले आहे. त्यामुळे सदर कामास अद्याप सुरुवात केलेली नाही. काळू प्रकल्पाच्या बांधकामास मा.उच्च न्यायालयाचे अंतरिम आदेशा अन्वये स्थगिती दिली असल्याने काम दिनांक १.३.२०१२ पासून बंद आहे. मा.उच्च न्यायालयाचे आदेशान्वये आवश्यक संवैधानिक मंजूऱ्या प्राप्त करुन घेणेची कार्यवाही सरु आहे. वनजमीनीसाठी नक्त वर्तमान मूल्याची रक्कम भरणा करणेसाठी अद्याप मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने रक्कम उपलब्ध करुन दिलेली नाही. त्याबाबत पाठपुरावा चालू आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## यवतमाळ येथील संरक्षित वन क्षेत्रातून सागवान वृक्षांची अवैधरित्या तोड केल्याबाबत

**(४) * ४६५५७ श्री.राजु तोडसाम (अर्णी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ येथील संरक्षित वन क्षेत्रातून सुमारे १३ ट्रक सागवान वृक्षाची तोड करून साग माल नागपूर व हैद्राबाद येथे तस्करीद्वारे पोहचविल्याचे दिनांक ७ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, दोषी आढळून आलेल्या व्यक्तींनी त्यांच्याकडे वन विभागाचे कोरे रहदारी पास असल्याबाबतची कबुली दिली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार दोषींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) दिनांक १५.१०.२०१५ रोजी पांढरकवडा आदिलाबाद रोडवर जप्त केलेल्या वाहनाची चौकशीमध्ये मुख्य आरोपीने सदर घटनेपूर्वी खाजगी मालकी क्षेत्रातील व एक प्रकरणी ई वर्ग शासन मालकीचे क्षेत्रातून अवैधरित्या तोड केलेल्या साग माल १३ ट्रक मध्ये भरुन वाहतूक केल्याचे कबूल केले आहे.

(२) हे खरे नाही. तथापि, दोषी असलेल्या व्यक्तींकडे रहदारी पासवर उपरीलेखन करुन त्याद्वारे मालाची मात्रा वाढविली असल्याचे आढळले.

(३) उक्त प्रकरणी मुख्य आरोपी याचे सह ७ आरोपींना अटक करुन न्यायालयात सादर केलेले आहे. तसेच प्रथमदर्शनी दोषी आढळलेले क्षेत्र सहायक, यवतमाळ व वनमजूर यांना निलंबीत करण्यात आलेले आहे व वनपरिक्षेत्र अधिकारी (प्रादेशिक) यवतमाळ व सहायक वनसंरक्षक (जंकास व कॅम्पा) यवतमाळ यांना कारणेदाखवा नोटीस देण्यात आलेली आहे.

(४) विलंब झालेला नाही.

----------------

## मौजे आंजर्ले (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील ताडाचा कोंड या वाडीतून जाणाऱ्या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याकरीता निधी मिळण्याबाबत

**(५) * ५२२८१ श्री.संजय कदम (दापोली) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे आंजर्ले (ता.दापोली, जि.रत्नागिरी) येथील श्री.क्षेत्र कड्यावरचा गणपती हे प्राचीन काळचे मंदिर अतिशय प्रसिध्द असून दररोज शेकडो पर्यटक या मंदिरात दर्शनासाठी येत असतात, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, आंजर्ले मुख्य रस्त्यापासून श्री क्षेत्र कड्यावरचा गणपती मंदिरापर्यंतचा ताडाचा कोंड या वाडीतून जाणाऱ्या रस्त्याची दुरवस्था झाली असून, या रस्त्याचे खडीकरण व डांबरीकरण करण्याकरीता, स्थानिक विकास निधी २५/१५ अंतर्गत तीस लाख रुपये इतका निधी उपलब्ध करुन देण्यात यावा, असे निवेदन येथील स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी मा.ग्रामविकास मंत्री यांच्याकडे दिनांक १५ जानेवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या निवेदनावर शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) व (४) आंजर्ले गणपती मंदीर जोड रस्ता हा ग्रामीण मार्ग क्र. ११७ दर्जाचा असल्याने २५१५ योजनेमध्ये या रस्त्याच्या कामाचा समावेश करता येत नाही. तथापि, सदर रस्त्याची दुरवस्था झाल्यामुळे रस्त्याचे डंबरीकरण नुतनीकरण करण्यासाठी रु.१८,६६,८०६/- इतक्या रकमेच्या अंदाज पत्रकास तांत्रिक मान्यता देऊन जिल्हा नियोजन अधिकारी यांच्याकडे प्रशासकीय मान्यतेसाठी पाठविण्यात आले आहे.

-----------------

## डहाणू व पालघर (जि.पालघर) तालुक्यातील सुर्या प्रकल्पांतर्गत असलेल्या कालव्याचे बांधकाम क्षतिग्रस्त झाल्याबाबत

**(६) * ५३०१३ श्री.अमित घोडा (पालघर) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) डहाणू व पालघर (जि.पालघर) तालुक्यातील सुर्या प्रकल्पांतर्गत असलेले कालवे ३० ते ३५ वर्षे जुने झाले असून धरणाचे मातीकाम तसेच बांधकाम क्षतिग्रस्त झाल्याने शेवटपर्यंतच्या गावांना शेतीसाठी पाणी पोहचत नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, कालव्याच्या दुरुस्तीबाबत शासनाकडे लोकप्रतिनिधींकडून वारंवार मागणी करण्यात येत असून, सुर्या धरणाचा डावा कालवा, बोरशेती येथे दोन ब्रिज बांधले नसल्याने लालोंडे व वेळगाव ह्या गावांमध्ये सर्व कालव्यांची कामे पूर्ण झालेली असतांनासुध्दा या गावांना पाणी पोहचत नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदरहू गावांना पाणी पुरवठा करण्याकरीता क्षतिग्रस्त झालेल्या कालव्याचे बांधकाम तसेच सुर्या धरणाचा डावा कालवा, बोरशेती येथे दोन ब्रिज बांधण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास,विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

धरणाचे मातीकाम सुस्थितीत आहे. तथापि कालव्याची वितरण व्यवस्थेसह कामे ३०-३५ वर्षा पुर्वीची असल्याने कालवा अस्तरीकरण व बांधकामे क्षतिग्रस्त

होत आहेत. तथापि लाभक्षेत्रातील शेतकरी सिंचनापासून वंचित राहणार नाही यादृष्टीने दरवर्षी उपलब्ध होणाऱ्या निधीतून तात्पुरती दुरुस्ती करुन सिंचनासाठी मागणी करणाऱ्या सर्व शेतकऱ्यांना पाणी देण्यात येते.

(२) व (३) होय.

सुर्या डावा कालवा कि.मी. ३३ पर्यंत पूर्ण असून तेथपर्यंत पाणी सोडण्यात येते. बोरशेती भाग डावा कालवा कि.मी. ३४ च्या भागात आहे. सा.क्र. ३३/०५४ येथील जलसेतूच्या अधो बाजूस वनजमिन असून वनजमिनीच्या प्रस्तावास केंद्र शासनाच्या वनविभागाची अंतिम मान्यता मिळालेली नसल्याने भरावाचे काम करता आलेले नाही. पर्यायाने त्यापुढील लालोंडे व वेळगावच्या भागात (कि.मी. ३६ ते ३९ पर्यंत) वनजमिनी व्यतिरिक्त भागात कालव्याचे काम झालेले असले तरी कालवा सलगते अभावी पाणी सोडता येत नाही.

जुनी क्षतिग्रस्त बांधकामे व अस्तरीकरण कामांच्या कायमस्वरुपी दुरुस्तीचे प्रस्ताव तयार करण्याची कार्यवाही क्षेत्रिय स्तरावरुन प्रगतीपथावर आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## अडगाव (ता.नेर, जि.यवतमाळ) येथील जिल्हा परिषदेच्या शाळेतील मुख्याध्यापकाने खोट्या सह्या करुन केलेला गैरव्यवहार

**(७) * ५११४४ श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद उच्च प्राथमिक मराठी हायस्कूल, अडगांव (ता.नेर, जि.यवतमाळ) शाळेच्या संयुक्त खाते असलेल्या युनियन बँक ऑफ इंडिया खा.क्र. ४५६७०२०१००२०४८४ व यवतमाळ जिल्हा मध्यवर्ती बँक शाखा, सिरसगांव येथे खा.क्र. ००७११११०२००६८ असून या दोन्ही खात्यातून प्रदिप केशवराव तिखे, मुख्याध्यापक यांनी शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्षांच्या खोटया सहया करुन १,१०,०००/- रुपये काढले असल्याची बाब माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा दरम्यान निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबतची तक्रार गट शिक्षणाधिकारी, पंचायत समिती, नेर (जि.यवतमाळ) यांच्याकडे दिनांक ४ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास केली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीत काय आढळून आले, तद्नुसार संबधित दोषी मुख्याध्यापकावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय. असे अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, अडगांव यांचे तक्रारीवरुन निदर्शनास आले होते.
(२) होय.
(३) व (४) प्रस्तुत प्रकरणी पंचायत समिती, नेर व जिल्हा स्तरावरुन केलेल्या प्राथमिक चौकशी अंती मुख्याध्यापक, जिल्हा परिषद उच्च प्राथमिक शाळा अडगांव ता.नेर यांनी, अध्यक्ष, शाळा व्यवस्थापन समिती, अडगांव यांच्या खोट्या (बनावट) स्वाक्षरी केल्याप्रकरणी संशय निर्माण होत असल्याने, त्यांना निलंबित करण्यात आले असून विभागीय चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

-----------------

## इंदिरा आवास योजनेतंर्गत घरकुल लाभार्थ्यांना उन्नत चुल्हा अभियान योजनेचा लाभ मिळण्याबाबत

**(८) * ४७८७६ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा), श्री.सुभाष साबणे (देगलूर) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) केंद्र शासनाच्या नवीन व नुतनीकरण ऊर्जा मंत्रालयाने उन्नत चुल्हा अभियान योजना दिनांक २७ जुन,२०१४ रोजीच्या आदेशान्वये सुरु केलेली असून, महिलांच्या आरोग्याशी व प्रदुषण कमी करणे या बाबींशी संबंधित ही योजना आहे या योजनेसाठी राज्याला लक्ष्यांक दिलेले आहे, हे खरे आहे काय,
(२) तसेच उन्नत चुल्हा अभियान योजनेची कार्यवाही इंदिरा आवास योजनेंतर्गत कार्यवाहीशी सुसंगत करावी असे केंद्र शासनाच्या ग्रामविकास विभागाने दिनांक ४ सप्टेंबर,२०१४ रोजीच्या पत्रान्वये कळविलेले आहे, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, केंद्र शासनाच्या सुचना असूनही इंदिरा आवास योजनेची अंमलबजावणी मार्गदर्शक तत्वानुसार केली जात नाही तसेच अदयापपर्यंत घरकुल लाभार्थ्यांना निर्धुर चुलीचा पुरवठाही केला जात नाही,हे ही खरे आहे काय,

(४) असल्यास, उन्नत चुल्हा अभियान योजनेचा लाभार्थ्यांना लाभ मिळण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.
(२) होय.
(३), (४) व (५) उन्नत चुल्हा अभियानाबाबत कार्यान्वयन सुचना (Operational Guidelines) संदर्भात केंद्र शासनाकडून मार्गदर्शन मागविले आहे. केंद्र शासनाच्या मार्गदर्शक सूचना प्राप्त होताच, इंदिरा आवास योजनेच्या लाभार्थ्यांना निर्धुर चुलीची उपलब्धता करण्यासंदर्भात योग्य ती कार्यवाही करण्यात येईल.

-----------------

**कळंब व उस्मानाबाद (जि.उस्मानाबाद) तालुक्यात जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कामांमध्ये झालेली अनियमितता**

**(९) * ५१७८८ श्री.ज्ञानराज चौगुले (उमरगा) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) उस्मानाबाद जिल्ह्यातील कळंब व उस्मानाबाद तालुक्यात कृषि विभागाद्वारे झालेल्या जलयुक्त शिवार योजनेंतर्गत कामांमध्ये अनियमितता झाल्याने शासनाच्या लाखो रुपयांचा गैरव्यवहार झाल्याचे निदर्शनास आले, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकरणी जिल्हा कृषी अधिक्षक यांना निलंबीत करण्याबाबतचा प्रस्ताव संबंधितांकडे पाठविण्यात येण्याबाबत मा.पालकमंत्री, उस्मानाबाद जिल्हा यांनी जिल्हाधिकारी, उस्मानाबाद यांना दिनांक २६ ऑगस्ट, २०१५ रोजी लेखी पत्राद्वारे सुचीत केले होते, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय, चौकशीनुसार दोषी अधिकाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) होय, हे खरे आहे.

(३) मा.पालकमंत्री यांच्या सुचनेप्रमाणे उपजिल्हाधिकारी (पुनर्वसन) याचे अध्यक्षतेखाली त्रिस्तरीय चौकशी समिती गठीत करण्यात आली होती.व समितीने चौकशी सुरू केली होती.

तथापि, सदर चौकशी समितीचे अध्यक्ष उपजिल्हाधिकारी यांनी त्यांचेपेक्षा वरिष्ठ अधिकाऱ्याची चौकशी करणे संयुक्तीक नसल्याने सदर समितीचे कामकाज थांबविण्यात आले. व उपरोक्त प्रकरणाची चौकशी संबंधित विभागामार्फत करण्यात यावी असे मा.पालकमंत्री यांनी सुचित केले आहे.तसेच कृषि विभागाच्या दि.१४/३/२०१६ रोजीच्या आदेशान्वये संबंधित अधिकाऱ्यावर निलंबनाची कारवाई करण्यात आलेली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे भोड (ता.जि.अकोला) येथील कोल्हापूरी बंधारा कामात झालेला गैरव्यवहार**

**(१०) * ५२८८७ श्री.रणधीर सावरकर (अकोला पूर्व) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जिल्हा परिषद अकोला अंतर्गत भोड कोल्हापूरी बंधाऱ्याच्या कामात गैरव्यवहार केल्या प्रकरणी लघुसिंचन विभागाच्या शाखा अभियंत्यांवर तत्कालीन मुख्याधिकारी यांनी निलंबनाचे आदेश काढले होते, परंतु उक्त निलंबन आदेशाची अंमलबजावणी जिल्हा परिषद प्रशासनाने केलेली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणाची चौकशी झाल्यावर संबंधीत अभियंत्यांवर गुन्हे दाखल करण्यात आले होते, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, दोषी अभियंते व संबंधितांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही. तत्कालीन मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी श्री.मडावी, शाखा अभियंता यांच्या निलंबनास नस्तीवर मान्यता दिली असली तरी निलंबनाच्या आदेश प्रारुपावर स्वाक्षरी झालेली नव्हती. त्यामुळे निलंबनाचे आदेश काढण्यात आले नव्हते.

(२) व (३) होय, हे खरे आहे. जिल्हा परिषद, अकोला अंतर्गत मौजे भोड ता.अकोला येथील कोल्हापूरी बंधारा कामात शाखा अभियंता, श्री.धनराज मडावी

व उपअभियंता शरद राजाराम सोनावणे यांनी रु. ९,१८,०४३/- रुपयांचा अपहार केल्याचे चौकशीअंती निदर्शनास आले. त्यानुसार त्यांना दोषी धरुन अपहार झालेल्या रक्कमेच्या वसुलीचा आदेश दिल्यानुसार दोन्ही अधिकाऱ्यांनी अपहारित रक्कमेचा भरणा केला आहे.

त्याबरोबरच शासनाची फसवणूक केल्याप्रकरणी त्यांच्याविरुध्द अकोटफैल पोलीस स्टेशन मध्ये प्रथम खबरी अहवाल क्र.११२/०९, दि.१९/०९/२००९ रोजी भा.द.वि .४०९,४२०, ४६७, ४६८, ४७१ (१२०ब) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असुन सद्यस्थितीत सदरहू प्रकरण अकोला न्यायालयात प्रकरण क्र.आर.सी.सी क्र.१७४/२०१० अनुसार न्यायप्रविष्ठ आहे.

श्री सोनावणे, उपअभियंता यांची त्या ठिकाणाहून बदली करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तरंगवाडी (ता.इंदापूर) येथील कालव्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(११) * ४९५६० श्री.भिमराव तापकीर (खडकवासला) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) इंदापूर तालुक्यातील तरंगवाडी जवळ खडकवासला कालव्यातून पूर्ण क्षमतेने पाणी आल्याने कालवा जीर्ण होऊन खचल्याने लाखो लिटर पाणी वाया गेल्याची घटना दिनांक १० फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, खडकवासला कालव्याच्या दुरुस्तीसाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) फुटलेला भरावा त्वरीत दुरुस्त करुन कालवा पुर्ववत करण्यात आला आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**मौजे चिरली (ता.बिलोली, जि.नांदेड) येथील ढाळीचे**
**बांध बंदिस्ती कामात झालेली अनियमितता**

**(१२) * ५२७७३ श्री.डी.पी.सावंत (नांदेड उत्तर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे चिरली (ता.बिलोली, जि.नांदेड) येथे पाणलोट विकास योजने अंतर्गत १६३ शेतकऱ्यांची नावे कागदोपत्री नोंदवून कामे न करताच अनुदान घेतल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या चौथ्या आठवड्यात निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय, चौकशीनुसार दोषी व्यक्तींवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय.

(२) जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, नांदेड यांचेकडील चौकशी अहवालानुसार मौजे चिरली, ता.बिलोली, जि. नांदेड येथील ढाळीचे बांध बंदिस्ती कामात झालेल्या अनियमिततेच्या अनुषंगाने विभागीय कृषि सहसंचालक, लातूर यांनी एका कृषि सहायकास दिनांक १७.३.२०१६ च्या आदेशान्वये निलंबित केले आहे. इतर अधिकाऱ्यांबाबतच्या विभागीय चौकशीचा प्रस्ताव दिनांक २२ मार्च,२०१६ रोजी कृषि आयुक्तालयास सादर करण्यात आला असून त्यामध्ये दोषी अधिकारी/ कर्मचारी यांचेविरुध्द महाराष्ट्र नागरी सेवा (शिस्त व अपील) नियम, १९७९ च्या नियम ८/१२ नुसार विभागीय चौकशी प्रस्तावित केलेली आहे. त्यानुसार आयुक्त, कृषि यांचे स्तरावर प्रस्तुत प्रस्तावाची छाननी सुरु असून पडताळणी अंती पुढील कार्यवाही करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**वसई-विरार (जि.पालघर) शहरातील शासकीय रुग्णालयात**
**अद्यावत सुविधा व डॉक्टरांचा अभाव असल्याबाबत**

**(१३) * ४१६४५ श्रीमती मनिषा चौधरी (दहिसर) :** सन्माननीय **सार्वजनिक आरोग्य आणि कुटुंब कल्याण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वसई-विरार (जि.पालघर) शहर महानगरपालिका हद्दीतील १४ शासकीय रुग्णालये व दोन महापालिकेच्या रुग्णालयात अद्यावत सुविधा व डॉक्टरांचा अभाव असल्यामुळे नागरिकांच्या आरोग्याचा गंभीर प्रश्न निर्माण झालेला आहे, हे खरे आहे काय.

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी केली आहे काय, चौकशीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे.

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. दीपक सावंत :** (१) हे खरे नाही. वसई-विरार शहर महानगरपालिका हद्दीत सद्य:स्थितीत महानगर पालिकेची दोन रुग्णालये व एक शासकीय ग्रामीण रुग्णालय कार्यान्वित आहे.

महानगर पालिकेच्या रुग्णालयात विविध विभाग कार्यरत असून वैद्यकीय अधिकारी, स्त्रीरोगतज्ञ भिषक, बालरोगतज्ञ व इतर तज्ञ डॉक्टर्स वेळोवेळी उपलब्ध होतात. त्यामुळे नागरिकांना वेळेवर औषधोपचार मिळत आहेत. तसेच शासकीय रुग्णालयात येणाऱ्या रुग्णांना योग्य औषधोपचार व आरोग्य सुविधा पुरविल्या जात आहेत. गुंतागुंतीच्या प्रसुती माता व इतर अत्यावस्थेतील रुग्ण महानगरपालिका रुग्णालयात संदर्भित केले जातात, त्यामुळे नागरिकांची गैरसोय होते हे म्हणणे खरे नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## वेदगंगा (जि.कोल्हापूर) नदीवरील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे स्तंभ कोसळल्याबाबत

**(१४) * ४८६९३ श्री.प्रकाश आबिटकर (राधानगरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वेदगंगा (जि.कोल्हापूर) नदीवरील कोल्हापूरी पध्दतीच्या बंधाऱ्याचे स्तंभ कोसळल्याचे दिनांक ३ फेब्रुवारी, २०१६ रोजी वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर बंधाऱ्यामध्ये २.५५ दशलक्ष पाणीसाठा होत असतांना सध्या बंधाऱ्यातून हजारो लिटर पाणी वाया जात असल्याने स्थानिक नागरिक व लोकप्रतिनिधींनी वारंवार पाठपुरावा करुन देखील अद्याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहते ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

पाटगांव प्रकल्पांतर्गत वेदगंगा नदीवरील गारगोटी, निळपण, करंबळी, शेळोली, वेंगरुळ व मडूर को.प. बंधा-याची पडझड होवून स्तंभ कोसळले आहेत.

(२) नाही.

सदर ६ को.प.बंधाऱ्यांची साठवण क्षमता ५.७५ दलघमी असून सन २०१४-१५ मध्ये १५५९ हे.क्षेत्र सिंचित झालेले आहे.

६ को.प.बंधाऱ्यांपैकी ५ को.प. बंधाऱ्यांच्या विशेष दुरूस्तीच्या कामांना प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आली आहे. निधीच्या उपलब्धते प्रमाणे सदर कामे पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

उर्वरित एक को.प.बंधाऱ्याचा विशेष दुरुस्ती प्रस्ताव तयार करण्याचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## आष्टी, पाटोदा व शिरुर (जि.बीड) तालुक्यातील सिंचन विहिरींची कामे पूर्ण करण्याबाबत

**(१५) * ५१५३८ ॲड.भीमराव धोंडे (आष्टी) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) आष्टी, पाटोदा व शिरुर (जि.बीड) तालुक्यात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत सन २०१५-१६ मध्ये सुमारे ६०० विहिरींची काम

प्रस्तावित केली असल्याची बाब माहे फेब्रुवारी, २०१६ च्या दुस-या आठवड्यात निदर्शनास आली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदरहू विहिरींच्या कामांची सद्य:स्थिती काय आहे तसेच सदरहू विहिरींची कामे तातडीने पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे आहे.

(२) आष्टी, पाटोदा व शिरुर तालुक्यात सन २०१५-१६ मध्ये महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत एकूण ६०० जलसिंचन विहिरींचे उद्दिष्ट देण्यात आले आहे. त्यापैकी ४६५ विहिरींना मंजूरी देण्यात आलेली असून १०४ विहिरींची कामे प्रगतीपथावर आहेत. मजूरांच्या कामाच्या मागणीनुसार उर्वरित सिंचन विहिरींची कामे तातडीने करण्याची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मेळघाट (जि.अमरावती) येथे रोजगार हमी योजनेची कामे मिळत नसल्याने मजुरांची होत असलेली उपासमार

**(१६) * ५२१४६ श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **रोजगार हमी योजना मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मेळघाट (जि.अमरावती) येथील मजुरांना कामे मिळत नाही व रोजगार हमी योजनेच्या मजुरांची उपासमार होत आहे, तसेच खाऱ्या, टेंभरु, कारादा, अढाव या गावामध्ये खोदकाम केलेल्या मजुरांना अद्याप २ महिने उलटूनही मजुरी मिळाली नाही, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणी चौकशी करण्यात आली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने मजुरांची मजुरी रोखणाऱ्यांवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**ताडोबा (जि.चंद्रपूर) अभयारण्यात वर्षभरात ११ वाघांचा झालेला मृत्यू**

**(१७) * ५१७२९ श्री.सुरेश धानोरकर (वरोरा) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चंद्रपूर येथील ताडोबा अभयारण्यात गेल्या वर्षभरात ११ वाघांचा मृत्यू झाला असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या वाघांचे मृत्यू होण्याची कारणे काय आहेत व यांस जबाबदार कोण आहेत,

(३) असल्यास, अभयारण्यातील वाघांचे होणारे मृत्यू रोखण्याकरिता कोणत्या विशेष उपाययोजना केल्या आहेत वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) व (२) ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पात मागील वर्षात वाघांच्या झुंजीमुळे-१ वाघ, नैसर्गिकरित्या-२ वाघ, वाहनाच्या धडकेने-१ वाघ व अंतर्गत रक्तस्त्रावामुळे-१ वाघ अशा रितीने एकूण ५ वाघांचा मृत्यू झाला आहे.

(३) प्रकल्प क्षेत्रातील वाघांचे होणारे मृत्यू रोखण्याच्या दृष्टीने खालीलप्रमाणे उपाययोजना करण्यात येतात.

- वनविभागातर्फे शिकारीवर नियंत्रण करण्यासाठी ताडोबा-अंधारी व्याघ्र प्रकल्पासाठी विशेष व्याघ्र संरक्षण दल (STPF) ची निर्मिती करण्यात आली आहे.
- विशेष व्याघ्र संरक्षण दलामार्फत कोर व बफर क्षेत्राच्या संवेदशील भागात नियमित दिवसरात्र गस्त घातली जाते .
- प्रकल्प क्षेत्रात ५५ संरक्षण कुटया प्रत्येक संरक्षण कुटीत १ वनरक्षक, २-३ वन मजूर मुक्कामी राहून रात्र- दिवस गस्त करीत असतात.
- महत्वाच्या ठिकाणी २९ तपासणी नाके उभारण्यांत आलेले आहे.

- बिनतारी संदेश यंत्रणा २४ तासाकरीता कार्यरत असून गस्तपथक सातत्याने कार्यरत आहे.
- कॅमेरा ट्रॅप लावून वाघ/बिबट यांच्या हालचालींची संनियंत्रण करण्यात येते.
- वन्यप्राणी उन्हाळयामध्ये पिण्याच्या पाण्याच्या शोधात नागरी वस्त्याकडे फिरकू नये व त्याअन्वये अवैध शिकारीस वाव मिळू नये यासाठी त्यांना वनातच पिण्यांचे पाणी उपलब्ध व्हावे यासाठी वनतलाव/ खोदतळे बांधणे, कृत्रिम पाणवठे (सिमेट टाके बांधणे) इत्यादी कामे करण्यांत आली आहेत.
- उपलब्ध बारमाही व हंगामी पाणस्थळावर नियमितपणे गस्त वाढवुन त्यामध्येसुध्दा पाणी जास्त काळ उपलब्ध राहील याबाबत काळजी घेण्यात येत आहे.
- जंगलातील विहीरींना एकूण ५०७ कठडे बांधण्यात आलेले आहे.
- संवेदनशील ठिकाणी रस्त्यावर वाहनांची गती कमी करण्याकरीता सार्वजनिक बांधकाम विभागाव्दारे गतिरोधक लावण्यात आलेले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## जळगाव जिल्हयातील पाणी टंचाई दूर करण्यासाठी गिरणा आवर्तनातून पाणी सोडण्याबाबत

**(१८) * ५१८५५ श्री.उन्मेश पाटील (चाळीसगाव) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जळगाव जिल्हयाचा पाणी टंचाईचा प्रश्न सोडविण्यासाठी गिरणा आवर्तनातून पाणी सोडण्याची मागणी जिल्हाधिकारी यांचेकडे स्थानिक लोकप्रतिनिधी यांनी माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान केली आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त मागणीच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) अंशत: खरे आहे.

गिरणा नदीकाठावरील ग्रामपंचायतीकडून गिरणा धरणातून आवर्तन सोडण्याची मागणी जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झालेली आहे.

(२) यावर्षी गिरणा धरणात अत्यल्प पाणीसाठा झाला असल्यामुळे सर्व पाणीसाठा पिण्याच्या प्रयोजनार्थ आरक्षित करण्यात आला आहे. गिरणा नदीतील पिण्याच्या पाण्याच्या योजनांसाठी पहिले आवर्तन दि.२५/११/२०१५ ते दि.३०.११.२०१५ या कालावधीत पाणी सोडण्यात आले आहे. तसेच दि.११.०३.२०१६ ते दि. १८.०३.२०१६ दरम्यान दुसरे आवर्तन देण्यात आले आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**कोरेगाव (जि.सातारा) येथे बांधण्यात आलेल्या**
**बंधाऱ्याच्या कामात झालेला गैरव्यवहार**

**(१९) * ४५९४४ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोरेगाव (जि.सातारा) येथील कृषी विभागाच्या वतीने सिमेंट कॉंक्रीटचे बंधारे विना टेंडर काढता अधिकाऱ्यांनी बनावट कंत्राटदाराच्या नावे बंधाऱ्याची कामे दाखवून स्वत:च बांधकाम करून करोडो रूपयांची उचल केली असल्याची माहिती दिनांक ३१ जानेवारी २०१६ रोजी वा त्यासुमारास निर्देशनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पाणलोट क्षेत्रात बाधंण्यात आलेले सिमेंट कॉंक्रीटचे बंधारे अंत्यत नित्कृष्ट दर्जाचे झालेले असून, या करोडो रूपयांच्या गैरव्यवहाराची तक्रार नागरिकांनी विभागीय आयुक्त यांच्याकडे केली असता, त्यांनी या प्रकरणाच्या चौकशीचे आदेश देवूनसुध्दा अद्यापही चौकशी करण्यात आलेली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणाची शासनाने चौकशी केली वा करण्यात येणार आहे,

(४) असल्यास, चौकशीनुसार दोषी अधिकाऱ्यांवर कोणती कारवाई करण्यात आली वा येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे अंशत: खरे आहे.

मौजे विटा जि.सांगली येथील नागरी हक्क जागृती संघटनेचे अध्यक्ष यांनी विभागीय आयुक्त पुणे यांचे कार्यालयाकडे तक्रार केली आहे.

(२) हे खरे नाही.

कोरेगाव (जि.सातारा) येथील पाणलोट क्षेत्रात बांधण्यात आलेले सिमेंट काँक्रीटच्या बंधा-याची चौकशी सुरु आहे.

(३) चौकशीची कार्यवाही सुरु आहे.

(४) व (५) चौकशी मध्ये दोषी आढळल्यास संबंधित अधिकारी / कर्मचारी यांचे विरुध्द नियमानुसार प्रशासकीय कारवाई करण्यात येईल.

-----------------

**येवला (जि.नाशिक) तालुक्यातील प्रलंबित जलसिंचन प्रकल्पांबाबत**

**(२०) * ५०२८१ श्री.नरहरी झिरवाळ (दिंडोरी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) येवला तालुक्यातील (जि.नाशिक) येथील प्रलंबित जलसिंचन प्रकल्पांना चालना देण्यासाठी तालुक्यातील विविध राजकीय पक्षाच्या प्रमुखांनी येवला बसस्थानकात दिनांक ११ जानेवारी, २०१६ रोजी पासून उपोषण केले असल्याचे निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) येवला तालुक्यात ३ लघु प्रकल्प पूर्ण झालेले असून बांधकामाधीन १ मोठा प्रकल्प आहे. येवला तालुक्यातून उर्ध्व गोदावरी मोठ्या प्रकल्पातील दरसवाडी पोहोच कालव्याचे काम प्रगतीपथावर आहे. या कालव्याची कामे निधी उपलब्धतेनुसार पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## सातारा जिल्ह्यातील जलयुक्त शिवार योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(२१) * ५२०८६ श्री.जयकुमार गोरे (माण), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सातारा येथे लघुसिंचन (जलसंधारण) तथा स्थानिक स्तर विभागाकडून करण्यात आलेल्या जलयुक्त शिवार योजनेच्या कामात गैरव्यवहार झाल्याचे तपासणी अहवालात माहे नोव्हेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त प्रकरणी चौकशी करण्याचे आदेश मा.मुख्यमंत्री यांनी दिले असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे हे खरे आहे काय,

(३) असल्यास शासनाने चौकशी केली आहे काय व त्यात काय निष्पन्न झाले आहे व त्यानुसार संबंधितांवर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.

तथापि, मा.श्री.जयकुमार गोरे वि.स.स. यांनी माण-खटाव मधील जलयुक्त शिवार अभियानांतर्गत बांधण्यात आलेले सिमेंट बंधारे निकृष्ट दर्जाचे झाले असल्याची तक्रार मा.मुख्यमंत्री महोदयांकडे दि.१५ डिसेंबर २०१५ चे पत्रान्वये केली आहे.

(२) होय, हे खरे आहे.

(३) उक्त प्रकरणी प्राप्त झालेल्या निवेदनाच्या अनुषंगाने उपविभागीय अधिकारी माण, उपविभाग माण यांचे अध्यक्षतेखाली त्रयस्थ यंत्रणेकडील तांत्रिक कर्मचारी यांची समिती स्थापन करुन बंधा-याच्या कामांची तपासणी व चौकशी करण्यात आली आहे. सदर समितीने चौकशीअंती काही त्रोटक त्रुटी वगळता कामांची गुणवत्ता चांगली असल्याचे कळविले आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**अमरावती येथील उर्ध्ववर्धा कालव्यावरील**
**विमोचकांची द्वारे नादुरुस्त झाल्याबाबत**

**(२२) * ४९६२७ ॲड.यशोमती ठाकूर (तिवसा), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), डॉ.संतोष टारफे (कळमनुरी), श्री.भारत भालके (पंढरपूर), श्री.अब्दुल सत्तार (सिल्लोड) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) अमरावती येथील ऊर्ध्ववर्धा कालव्याचे द्वारे तुटल्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी जात असल्याने शेतक-यांच्या शेतीचे मोठया प्रमाणात नुकसान होत असल्याचे माहे जानेवारी, २०१६ मध्ये वा त्यासुमारास निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदरील प्रकरणी शेतकऱ्यांनी संबंधित विभागाला वारंवार तक्रार देऊनही ऊर्ध्ववर्धा कालव्याची कामे केली जात नाहीत, हे ही खरे आहे काय,
(३) असल्यास, सदरील प्रकरणाबाबत शेतकऱ्यांच्या तक्रारीनुसार उक्त प्रकरणी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) उर्ध्व वर्धा कालव्यावरील काही विमोचकांची द्वारे नादुरुस्त झाल्यामुळे, तसेच काही ठिकाणी सिंचनाचे वेळी शेतकऱ्यांद्वारे विमोचके अतिरिक्त उघडल्याने पाटचाऱ्या ओसंडून वाहणाच्या घटना घडत असल्याची वस्तुस्थिती आहे. त्यानुसार शेतकऱ्यांकडून याविषयीच्या तक्रारी क्षेत्रिय कार्यालयाकडे प्राप्त होत आहे.
(२) व (३) तक्रार प्राप्त झाल्याबरोबर उपविभागीय स्तरावरुन प्राथमिक उपाययोजना करुन पाण्याचा प्रवाह थांबविण्यात येतो. तद्नंतर सदर तक्रारींच्या अनुषंगाने आवश्यक निधी देवून कायम स्वरुपी उपाय योजना करण्यात येतात.
(४) प्रश्न उद्भवत नाही.

----------------

**मौजे दरकवाडी (ता.खेड, जि.पुणे) या महसुली गावासाठी**
**स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबत**

**(२३) * ४७७२७ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चासकमान धरणामुळे विस्थापित झालेल्या मौजे दरकवाडी (ता.खेड, जि.पुणे) या महसूली गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत नसल्याचे माहे फेब्रुवारी २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, शासन निर्णय क्र./व्हीपीएम/२६०३/प्र.क्र.१५४४/पंरा-४ (२२) मंत्रालय मुंबई दिनांक १२/२/२००४ व शासन निर्णय क्र./ व्हीपीएम-२०११/प्र.क्र.१९१/पंरा-४ मंत्रालय मुंबई दिनांक ४ मार्च,२०१४ मध्ये नमुद केलेल्या निकष व अटीनुसार मौजे दरकवाडी (ता.खेड, जि.पुणे) ग्रामपंचायत स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव विभागीय आयुक्त, पुणे यांनी दिनांक ३० डिसेंबर, २०१५ रोजी प्रधान सचिव, ग्रामविकास विभाग यांसकडे मान्यतेकरीता पाठविला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रस्तावाबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबनाची कारणे काय आहे ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) व (२) होय, हे खरे आहे.

(३) मौजे कोयाळी तर्फे वाडा ता.खेड, जि.पुणे या ग्रामपंचायतीचे विभाजन करुन मौजे दरकवाडी या महसूली गावासाठी स्वतंत्र ग्रामपंचायत स्थापन करण्याकरिता महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम कलम ४ अन्वये दरकवाडी हे स्वतंत्र गाव म्हणून घोषीत करणेबाबतची अधिसूचना दिनांक १८ मार्च, २०१६ रोजी राजपत्रात प्रसिध्द करण्यात आली आहे.

(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**जलचक्र बु. (ता.बोदवड, जि.जळगांव) ग्रामपंचायतीमध्ये सरपंच व ग्रामसेवक यांनी केलेला गैरव्यवहार**

**(२४) * ५२८४५ श्री.गुलाबराव पाटील (जळगाव ग्रामीण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) जलचक्र बु. (ता.बोदवड, जि.जळगांव) ग्रामपंचायतीमध्ये दिनांक २९ डिसेंबर, २०११ ते ३० जुलै, २०१३ पर्यंत तत्कालीन सरपंच व ग्रामसेवक यांनी संगनमताने ८ लाख २० हजार रुपयांचा गैरव्यवहार केल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, या प्रकरणी चौकशी केली आहे काय, त्यात काय आढळून आले,
(३) असल्यास, चौकशीनुसार शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१), (२) व (३) हे खरे नाही, तथापि ग्रामपंचायत जलचक्र बु. ता.बोदवड, जि.जळगाव यांचे स्थानिक निधी लेखा परीक्षक यांनी सन २०११-१२ ते २०१३-१४ या कालावधीचे लेखापरीक्षण केले असता लेखापरीक्षण अहवालामध्ये अनियमितता आढळून आल्याने तत्कालीन ग्रामसेवकावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात आली आहे.
(४) विलंब झालेला नाही.

-----------------

**मौजे सालोड (ता.नांदगांव-खंडेश्वर, जि.अमरावती) येथील**
**निम्न साखळी सिंचन प्रकल्पाबाबत**

**(२५) * ४६९५६ प्रा.विरेंद्र जगताप (धामणगाव रेल्वे), श्री.अमिन पटेल (मुंबादेवी), प्रा.वर्षा गायकवाड (धारावी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे सालोड (ता.नांदगांव-खंडेश्वर, जि.अमरावती) येथील निम्न साखळी सिंचन प्रकल्पाची मुळ किंमत ३१ कोटी होती बुडीत क्षेत्रातील जमिनीचे भाव वाढल्याने प्रकल्प १०० कोटी पर्यंत जाणार असून वाढीव किंमतीचा फायदा जरी शेतकऱ्यांना होणार असला तरी किमान पाच वर्षात प्रकल्प पूर्ण होणार असल्याचे माहे डिसेंबर, २०१५ मध्ये वा त्या दरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, सदर प्रकल्प निर्धारित वेळेत पूर्ण करण्यासाठी शासनाने कोणते नियोजन केले वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय, निम्न साखळी प्रकल्पास विदर्भ पाटबंधारे विकास महामंडळ, नागपूर यांनी जुलै, २००९ मध्ये रु. ३४.९५ कोटी किंमतीस प्रशासकीय मान्यता दिली आहे.

भुसंपदान कायदा अधिनियम-२०१३ अन्वये भुसंपदानाची किंमत विचारात घेता प्रकल्पाची अद्यावत किंमत रु.१६०.४० कोटी येत आहे.

सुधारीत प्रशासकीय मान्यता प्रस्ताव क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(२) प्रकल्पाचे कामास माहे ४/२०१४ मध्ये सुरुवात करण्यात आली असून सद्य:स्थितीत मातीकाम ५० टक्के व सांडव्याचे काम १० टक्के पुर्ण झाले आहे. भुसंपदान व पुनर्वसन पूर्ण करुन निधीच्या उपलब्धतेप्रमाणे प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**सोनुर्ले (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील लघु पाटबंधारे तलावाचे काम अपूर्णावस्थेत असल्याबाबत**

**(२६) * ४१४१० श्री.सत्यजीत पाटील-सरुडकर (शाहूवाडी) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) सोनुर्ले (ता.शाहुवाडी, जि.कोल्हापूर) येथील लघु पाटबंधारे तलावास मंजुरी मिळून १४ वर्षे पूर्ण झाली असून सदर तलावामुळे आजूबाजूच्या परिसरातील शेतकऱ्यांना शेतीसाठी तसेच अन्य सर्व कामांसाठी मुबलक पाण्याची सोय होणार आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर तलावासाठी आवश्यक असणाऱ्या भूसंपादनाचे काम पूर्ण झालेले आहे तसेच तलावाचा खर्च पावणे आठ कोटींवरून ३४ कोटीवर पोहोचला असल्यामुळे निधी अभावी सदर प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत आहे, हे ही खरे हे काय,

(३) असल्यास, सदर प्रकल्पाला निधी मिळण्यासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) होय. मंजूर प्रशासकीय मान्यतेपेक्षा जास्त खर्च झाल्यामुळे सुधारीत मान्यतेअभावी प्रकल्पाचे काम अपूर्णावस्थेत आहे.

(३) सुधारीत प्रशासकीय मान्यतेचा प्रस्ताव क्षेत्रीय स्तरावर प्रगतीत आहे.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## मौजे कोंजवडे (ता.पाटण, जि.सातारा) येथील ग्रामपंचायतीने शासनाच्या निधीचा केलेला गैरवापर

**(२७) * ४१२४४ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) मौजे कोंजवडे (ता.पाटण, जि.सातारा) येथील ग्रामपंचायमध्ये विद्यमान सरपंच व ग्रामसेवकांनी ग्रामसभेमध्ये कधी ही उपस्थित नसलेल्या ग्रामस्थांच्या ग्रामपंचायतीच्या रजिस्टरमध्ये खोट्या सह्या करुन त्यांच्या नांवे ठराव करुन शासनाच्या निधीचा अनेकदा गैरवापर तसेच मागासवर्गीयांना लाभ न देता मागासवर्गीयांकरीता राखीव असणारा १५ टक्के निधीचा ही अपहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सरपंच व ग्रामसेवकांने केलेल्या या गैरव्यवहाराची चौकशी करुन दोषींवर कारवाई होण्याकरीता मौजे कोंजवडे गावातील ग्रामस्थांनी गावातील सर्व ग्रामस्थांच्या सह्या घेवून दिनांक ५ नोव्हेंबर,२०१३ रोजी सातारा जिल्हा परिषदेचे, मुख्य कार्यकारी अधिकारी, उपमुख्य कार्यकारी अधिकारी व ग्रामपंचायत यांना लेखी निवेदन दिले आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, सदर निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही

सदर ग्रामपंचायतीची सन २०१२-१३, २०१३-१४ व २०१४-१५ ची तपासणी केली असता प्रथमदर्शनी अपहार झाल्याचे दिसून येत नाही.

(२) हे खरे नाही, दिनांक ५ नोव्हेंबर, २०१३ रोजीचा ग्रामस्थांचा अर्ज प्राप्त झाला नाही. परंतु, ग्रामस्थांनी दिनांक २८.२.२०१५ रोजी मा.आमदार पाटण यांना तक्रार अर्ज सादर केला असून त्यांनी दिनांक २२.५.२०१५ रोजी उपमुख्य कार्यकारी अधिकारी यांना सादर केला आहे.

(३) सदर प्रकरणी गटविकास अधिकारी पंचायत समिती पाटण यांच्या चौकशी अहवालानुसार अपहार झाल्याचे दिसून येत नाही.

(४) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**कोंढारचिंचोली ते डिकमळ (ता.करमाळा, जि.सोलापूर) या रस्त्यावरील भीमा नदीवरील पुल धोकादायक झाल्याबाबत**

**(२८) * ५२९४७ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) कोंढारचिंचोली ते डिकमळ (ता.करमाळा, जि.सोलापूर) या रस्त्यावरील भीमा नदीवरील पुल कालबाह्य झाल्याने त्याचे बांधकाम क्षतिग्रस्त झाले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुलाची कालमर्यादा झालेली असताना त्यावरुन ऊस व वाळूसारखी अवजड वाहतूक चालू असल्यामुळे पुल धोकादायक बनला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, याबाबत शासनाने पाहणी केली आहे काय व त्यात काय आढळून आले,

(४) तद्नुसार शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे, नसल्यास, त्याची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, प्रश्नांकित भीमा नदीवरील पूल हा ब्रिटीशकालीन रेल्वे पूल असून सदरील पूल हा रेल्वे मार्ग म्हणून उजनी प्रकल्प होणेपूर्वी वापरात होता. परंतु उजनी प्रकल्प झाल्यामुळे रेल्वे मार्ग विस्थापित करणेत आला. सदर पूल हा रेल्वे विभागाकडून बांधण्यात आलेला आहे.

(२) सदर पूल धोकादायक आहे किंवा नाही याबाबत भार वाहन क्षमता तपासणी करुन मिळणेबाबत कार्यकारी अभियंता, मार्ग व प्रकल्प विभाग, पुणे यांना दिनांक १५.१२.२०१४ च्या पत्रान्वये जिल्हा परिषदेने कळविले आहे.

खबरदारीचा उपाय म्हणून जड वाहतुक करण्यास पुल प्रतिबंधीत करण्यात आलेला आहे. तसा फलक प्रत्यक्ष स्थळी जिल्हा परिषदेने लावलेला आहे.

(३) प्रश्नांकित पुलाची पाहणी जिल्हा परिषदेमार्फत करण्यात आली असून या पूलाच्या दोन दगडाच्या सांध्यामधील मॉर्टर अनेक ठिकाणी निखळलेले आढळून आले आहेत.

(४) प्रश्नांकित पूल हा उजनी धरणाच्या बुडीत क्षेत्रात येत असल्याने सदर पुलाचे काम पाटबंधारे विभागाकडून मंजूर करणेकामी कार्यकारी अभियंता, कृष्णा खोरे विकास महामंडळ, पुणे यांना दि.३१.८.२०१५ अन्वये जिल्हा परिषदेने कळविले आहे.

-----------------

## वांगणी (ता.अबंरनाथ, जि.ठाणे) येथे सुर्योदयनगरमध्ये अनधिकृत चाळींचे केलेले बांधकाम

**(२९) * ५०३४१ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) वांगणी पूर्वेकडील (ता.अंबरनाथ) सुर्योदयनगर फेज-२ मधील सव्हे क्र.५० पैकी २/३, गट क्र. १४२/१४४ या जमिनीवर एका भूमाफीयाने अनधिकृत चाळींचे बांधकाम केल्याबाबत माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, याप्रकरणी सुर्योदयनगर सोसायटीमार्फत जिल्हाधिकारी - ठाणे, तहसिलदार, ग्रामपंचायत यांच्याकडे तक्रारी केल्यावर तलाठी व प्रात विभागातील अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन सदर बांधकाम अवैध असल्याचा पंचनामा करुनही सदरचे बांधकाम निष्कासित करण्याबाबत अद्‌याप कोणतीही कार्यवाही करण्यात आली नाही, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त प्रकरणी शासनाने चौकशी केली आहे काय,

(४) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने अवैध चाळीचे बांधकाम करणाऱ्या भूमाफियांविरुध्द व त्यास मदत करणाऱ्या अधिकारी व कर्मचाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय हे खरे आहे

(२), (३) व (४) होय. याप्रकरणी तलाठी सजा वांगणी यांनी प्रत्यक्ष जागेवर जाऊन पंचनामा केला आहे त्यानुसार सदर प्रकरणी ग्रामपंचायतीने बांधकाम धारकास बांधकाम काढून टाकणेबाबत दिनांक २९.११.२०१४, दि.०७.०५.२०१५ व दि. २०.०५.२०१५ रोजी नोटीसा बजाविण्यात आलेल्या आहेत. तसेच विकासकाविरुध्द कुळगाव बदलापुर पोलीस ठाण्यात दिनांक १९.१०.२०१५ रोजी गुन्हा दाखल करण्यात आला असून महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ५२ व ५३ अन्वये बांधकाम तात्काळ काढून टाकणेबाबत सूचित करण्यात आले आहे.

(५) अशी बाब नाही.

-----------------

**राधानगरी (जि.कोल्हापूर) धरणाच्या सांडव्याची दुरुस्ती करण्याबाबत**

**(३०) * ४६३२१ श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) राधानगरी (जि.कोल्हापूर) येथील धरणाच्या सांडव्याची दुरुस्ती करण्याचा अहवाल अधिक्षक यांनी मा.जलसंपदा मंत्री व सचिव, जलसंपदा यांच्याकडे माहे जानेवारी, २०१६ च्या दुसऱ्या वा तिसऱ्या आठवड्यात दिला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार शासनाने आतापर्यंत कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) नाही.

(२) प्रश्न उद्भवत नाही.

तथापि राधानगरी धरण सांडवा दुरुस्ती कामाचे विशेष दुरुस्ती अंतर्गत प्रशासकीय मान्यता घेणेबाबतचे अंदाजपत्रक तयार करणेचे काम क्षेत्रिय स्तरावर प्रगतीत आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**रायगड जिल्हयातील पाचाड गावात विविध विकास कामे करण्याबाबत**

**(३१) * ४१९४० श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा), श्री.शशिकांत शिंदे (कोरेगाव), श्री.सुरेश लाड (कर्जत), श्री.पांडुरंग बरोरा (शहापूर), श्री.हसन मुश्रीफ (कागल), श्री.किसन कथोरे (मुरबाड), श्री.मकरंद जाधव-पाटील (वाई), श्री.जयंत पाटील (इस्लामपूर) :** सन्माननीय **जलसंधारण मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) रायगड जिल्हयातील राजमाता जिजाऊंचे समाधीस्थळ असलेल्या पाचाड गावाला विविध विकास कामे करण्यासाठी जलसंधारण विभागांतर्गत एक कोटी ९७ लाख रुपयांचा निधी माहे जानेवारी, २०१६ च्या तिसऱ्या आठवड्यात मंजूर केलेला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, ऐतिहासीक महत्व असलेल्या या गावातील नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी व विकास कामासाठी शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय, हे खरे आहे.

जलसंधारण विभागाच्या दि.१२ जानेवारी २०१६ चे शासन निर्णयान्वये पाचाड पाणलोट गतिमान पद्धतीने पूर्ण करणेसाठी रू.२८.७५ लक्ष निधी वितरित केला आहे.
(२) पाचाड पाणलोट गतिमान पद्धतीने पूर्ण करण्यासाठी सिमेंट नाला खोलीकरण, सिमेंट नाला बांध दुरूस्ती, गॅबियन स्ट्रक्चर्स, सलग समतल चर यासारख्या एकूण २१ कामांना प्रशासकिय मान्यता देऊन निधी वितरित करण्यात आला आहे. कामांच्या निविदा प्रक्रियेनंतर सदरील कामे पूर्ण करण्यात येणार आहेत.
(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

**उर्ध्व मानार (ता.लोहा, जि.नांदेड) प्रकल्पास निधी उपलब्ध करुन देण्याबाबत**

**(३२) * ४७८७९ श्री.प्रतापराव पाटील चिखलीकर (लोहा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) लिंबोटी वसाहत (ता.लोहा, जि.नांदेड) उर्ध्व मानार प्रकल्प निधी अभावी प्रलंबित असल्यामुळे निधी तात्काळ उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी मा.जलसंपदा मंत्री यांना दिनांक १ जानेवारी, २०१६ रोजी वा त्या सुमारास पत्रव्यवहार करुन देखील निधी उपलब्धतेबाबत कोणतीही कार्यवाही झालेली नाही, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त प्रकल्पास निधी उपलब्ध करुन प्रकल्प पूर्ण करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) व (२) उर्ध्व मानार प्रकल्पासाठी निधी उपलब्ध करुन देण्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दि.१९.१.२०१६ च्या पत्रान्वये मा.मंत्री (जलसंपदा) यांच्याकडे मागणी केली आहे. या प्रकल्पास सन २०१५-१६ मध्ये

रु.१५.०० कोटी तरतूद केली असून सन २०१६-१७ मध्ये रु.२० कोटीची तरतूद प्रस्तावित आहे.

निधीच्या उपलब्धतेनुसार प्रकल्प पूर्ण करण्याचे नियोजन आहे.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

## चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील चुनखडी, खडीमाल ते माडीझडप रस्त्याच्या कामामधील निधीचा झालेला अपहार

**(३३) * ५२१४८ श्री.प्रभुदास भिलावेकर (मेळघाट) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) चिखलदरा (जि.अमरावती) तालुक्यातील चुनखडी, खडीमाल ते माडीझडप रस्त्याच्या कामामध्ये ठेकेदाराने ७५ लाख रुपयांच्या निधीचा अपहार केला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रकरणाची चौकशी करण्यात आली आहे काय वा चौकशीअंती काय आढळून आले,

(३) असल्यास, चौकशीच्या अनुषंगाने सदर रस्त्यांच्या कामामध्ये गैरव्यवहार करुन निधीचा अपहार करणाऱ्या दोषींवर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) ते (४) हे खरे नाही.

प्रश्नांकित कामाच्या दर्जाबाबत तक्रार झाल्यामुळे चौकशी करीता राज्य गुणवत्ता नियंत्रककडे प्रकरण सोपविले असून त्यांनी दिनांक ०१.०२.२०१६ रोजी प्रत्यक्ष पाहणी केलेली आहे. अद्याप त्यांच्याकडून अहवाल प्राप्त झालेला नाही.

-----------------

## यवतमाळ व पुसद वनविभागातंर्गत करण्यात आलेल्या जलशिवार योजनेच्या कामात झालेला गैरव्यवहार

**(३४) * ५१७९९ श्री.विजय वडेट्टीवार (ब्रम्हपूरी) :** सन्माननीय **वने मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) यवतमाळ वनविभागातील हिवरी वनपरिक्षेत्रात नियोजनाच्या निधीतून तीन कोटींची कामे जलयुक्त शिवारमध्ये वन अधिकाऱ्यांच्या संगनमताने विना निविदेद्वारे दोन कंत्राटदाराच्या माध्यमातून करण्यात आली असून ही कामे अपूर्ण असताना पुर्ण झाल्याचे दाखवून, तसेच कामे निकृष्ट दर्जाची झाली असतांनासुध्दा संबंधित कंत्राटदारास करोडो रूपयांची देयके देण्यात आली असल्याची माहिती दिंनाक १९ फेब्रुवारी २०१६ रोजी वा त्या सुमारास निदर्शनास आली, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, पुसद वनविभागातही विदर्भ पाणलोट योजनेअंतर्गत करण्यात आलेल्या ८० लाखांच्या कामात वरिष्ठ वनधिकाऱ्यांच्या संगनमताने मोठया प्रमाणात गैरप्रकार करून वनधिका-यांनी स्वत:च्याच मशीनने सर्व कामे करून बनावट देयके कागदपत्राव्दारे ८० लाखांची देयके उचल करून वनपरिक्षेत्र अधिकाऱ्यांनी या कामाचे आणि पाणलोट कामाचे लेखे व कॅशबुकच गहाळ करून टाकण्यात आले असल्याची माहिती निदर्शनास आली आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, या प्रकरणाची शासनाने चौकशी केली वा करण्यात येत आहे,

(४) असल्यास, या प्रकरणी चौकशीनुसार संबधितावर कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(५) नसल्यास, विलंबाच कारणे काय आहेत ?

**श्री. सुधीर मुनगंटीवार :** (१) हे खरे नाही.

(२) हे अंशत: खरे आहे.

पाणलोट विकास मिशनअंतर्गत कामे मशिनद्वारे करावयाची असल्यास जिल्हा पाणलोट विकास समितीची परवानगी घेणे आवश्यक आहे. तथापि, समितीची परवानगी न घेता मशिनद्वारे कामे करण्यात आली आहेत. तसेच काही ठिकाणी करण्यात आलेल्या कामांची देयके धनादेशाद्वारे न करता रोखीने अदा केल्याचे दिसून आले आहे. तथापि पाणलोट कामाचे लेखे, अभिलेख, कॅशबुक गहाळ झाल्याची बाब निदर्शनास आलेली नाही.

(३) व (४) प्रश्न भाग क्र. २ मधील नमूद अनियमितता व इतर त्रुटी संबंधाने पाणलोट समित्यांचे सचिव म्हणून कार्यरत वनपाल-१०, वनरक्षक-९ व सेवानिवृत्त वनपाल ७ अशा एकूण २६ क्षेत्रीय कर्मचाऱ्यांवर महाराष्ट्र नागरी सेवा

(शिस्त व अपिल) नियम, १९७९ च्या नियम १० अन्वये शिस्तभंगाची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने अवैद्यरित्या उजनी धरणात पाणी सोडण्याच्या दिलेल्या निकालाबाबत**

**(३५) * ५२७२३ श्री.सुरेश गोरे (खेड आळंदी), श्री.बबनराव शिंदे (माढा), श्री.जितेंद्र आव्हाड (मुंब्रा कळवा) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ रोजी अवैद्यरित्या उजनी धरणात पाणी सोडण्याचा निकाल दिल्याबाबत स्थानिक लोकप्रतिनिधींनी दिनांक १७ नोव्हेंबर, २०१५ रोजी वा त्यासुमारास मा.मुख्य सचिव महाराष्ट्र शासन यांच्याकडे निवेदन दिले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, उक्त निवेदनाच्या अनुषंगाने शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय

(२) महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाने दिनांक २६ ऑक्टोबर, २०१५ रोजी दिलेल्या निर्णयाच्या विरोधात श्री. सुरेश नामदेव गोरे वि.स.स. व इतर यांनी मा. उच्च न्यायालयात याचिका दाखल केली होती. या न्यायालयीन प्रकरणी दिनांक ३.१२.२०१५ रोजी दिलेल्या अंतरिम निकालानुसार महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरणाचा दिनांक २६/१०/२०१५ चा निकाल रददबातल केले व फेरसुनावणीचे आदेश दिले. त्यानंतर महाराष्ट्र जलसंपत्ती नियमन प्राधिकरण व न्यायालयात वेळोवेळी सुनावणी झाली. व त्यांनी दिलेल्या निकालानुसार कार्यवाही पुर्ण झाली.

(३) प्रश्न उद्भवत नाही.

-----------------

**तारळी धरण (ता.पाटण, जि.सातारा) प्रकल्पातील कालव्याच्या कामांबाबत**

**(३६) * ५२३५८ श्री.शंभूराज देसाई (पाटण) :** सन्माननीय **जलसंपदा मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पाटण तालुक्यातील (जि.सातारा) तारळी धरण प्रकल्पातील पाणी शेतीला देण्याकरिता शासनाने मोठया प्रमाणात निधी देवून कालव्याचे काम सुरु करण्यात आले आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, प्रकल्पाने नेमलेल्या खाजगी कंत्राटदार यांनी संबंधित अधिकारी यांच्याशी संगनमताने कालव्याचे काम करताना मोठ्या प्रमाणात खुदाई करुन उत्खननही करण्यात आलेल्या उत्खननातील डबर उचलून नेताना तुटपुंजी रॉयल्टी भरुन रॉयल्टीच्या कितीतरी अधिक पटीने डबर उचलून यामध्ये अपहार केला आहे, हे ही खरे आहे काय,

(३) असल्यास, उक्त कालव्यांमध्ये किती लांबीचे व खोलीची खुदाई करण्यात आली असून यातून किती प्रमाणात उत्खनन करण्यात आले आहे तसेच उत्खननाच्या रॉयल्टीमध्ये अपहार करणाऱ्या अधिकारी व कंत्राटदारावर शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,

(४) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. गिरीष महाजन :** (१) होय.

(२) हे खरे नाही.

(३) कोपर्डे पोहोच कालव्याचे बोगद्याचे आगमन व निर्गमन बाजूकडील १२० मी. लांबीच्या उघड्या कालव्याच्या भागात सरासरी ६.०० मी. खोलीने खोदकाम करणेत आलेले आहे. त्यामधील जमिनीखालील बोगद्याच्या एकूण ११६७० मी. लांबीपैकी १०२३९ मी. लांबीचे खोदकाम झाले असून त्या लांबीमध्ये बोगद्याची जास्तीत जास्त ५.६५ मी. खोलीने खोदाई करणेत आली आहे. डबर साहित्याचे ३,१२,५४८ घ.मी. इतक्या परिमाणाचे खोदकाम / उत्खनन झालेले आहे. उघड्या कालव्यासाठी मऊ स्तरातील ६,४४० घ.मी. इतक्या परिमाणाचे खोदकाम / उत्खनन झालेले आहे. खोदकामातून निघालेल्या डबर साहित्यापैकी ३८२०.५० घ.मी. डबर साहित्याची मागणी ११ अर्जदारांनी विभागाकडे वेळोवेळी केली होती. त्यापैकी १० अर्जदारांनी मागणी केलेल्या ३२५५.५० घ.मी. साहित्याची महसूल खात्याकडील विहित दराने देय ठरणारी रॉयल्टीची रु. ३१००००/- इतकी रक्कम महसूल खात्याकडे जमा केल्यानंतर त्यांना डबर साहित्य उचलणेस परवानगी

दिलेली आहे. यामध्ये कोणत्याही प्रकारचा अपहार निदर्शनास आला नसल्याने कार्यवाही करणेचा प्रश्न उद्‌भवत नाही.
(४) प्रश्न उद्‌भवत नाही.

-----------------

## मौजे रिटेवाडी (ता.करमाळा, जि.सोलापूर) या पुर्नवसित गावास मुलभूत सोयीसुविधा पुरविण्याबाबत

**(३७) * ५२९५२ श्री.नारायण पाटील (करमाळा) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) मौजे रिटेवाडी (ता.करमाळा, जि.सोलापूर) या पुर्नवसित गावास मुलभूत सोयीसुविधा पुरविण्यात आल्या नसल्याचे माहे फेब्रुवारी, २०१६ मध्ये वा त्यादरम्यान निदर्शनास आले आहे, हे खरे आहे काय,
(२) असल्यास, उक्त पुर्नवसित गावात वीज, पाणी व रस्ता आदी पुरविण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) हे खरे नाही.
(२) व (३) मौजे रिटेवाडी ता.करमाळा या पुर्नवसित गावामध्ये वीज, पाणी, रस्ते इत्यादी मुलभूत सुविधा पुरविण्यात आलेल्या आहेत.

-----------------

## कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायतीमध्ये अनधिकृत बांधकामे होत असल्याबाबत

**(३८) * ५३२९६ श्री.रुपेश म्हात्रे (भिवंडी पूर्व) :** सन्माननीय **ग्रामविकास मंत्री** पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-
(१) कुडूस (ता.वाडा, जि.पालघर) ग्रामपंचायतीमध्ये तळ मजला अधिक दोन मजले बांधकामाची परवानगी असताना १६ बांधकाम व्यावसायिकांनी अनधिकृतरित्या एक अतिरिक्त मजल्याचे बांधकाम केल्याप्रकरणी सरपंच, उपसरपंच व सदस्य यांच्याविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम, १९५८ कलम ३९(१) अन्वये तसेच ग्रामविकास अधिकारी यांच्यावर जिल्हा परिषद, पालघर यांचेमार्फत सुरु असलेली कारवाई पूर्ण झाली आहे काय,

(२) तसेच ग्रामपंचायतीची परवानगी नसताना अनधिकृतरित्या बांधकाम करणाऱ्या १६ बांधकाम व्यावसायिक व ग्रामविकास अधिकाऱ्यांविरुध्द शासनाने कोणती कारवाई केली वा करण्यात येत आहे,
(३) नसल्यास, विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्रीमती पंकजा मुंडे :** (१) होय अंशत: झाली आहे.

सदरची अनधिकृत बांधकामे काढून टाकण्यास ग्रामपंचायतीने दिरंगाई केल्यामुळे कुडूस ग्रामपंचायतीचे सरपंच यांच्याविरुध्द महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ३९ (१) अन्वये कारवाई करुन विभागीय आयुक्त, कोकण विभाग आदेश दिनांक ११.०३.२०१६ नुसार सरपंच यांना सदर पदावरुन तसेच सदस्य पदावरुन काढून टाकण्यात आले आहे
(२) सदर बांधकाम व्यावसायिकांना महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५८ कलम ५२ नुसार नोटिस बजाविण्यात आली आहे व केलेले अनधिकृत बांधकाम निष्कासित करण्याबाबत लेखी सूचना दिल्या आहेत. तसेच ग्राम विकास अधिकाऱ्यांविरुध्द शिस्तभंगविषयक कार्यवाही प्रस्तावित करण्यात आली आहे.
(३) अशी बाब नाही.

-----------------

**विधान भवन :** **डॉ. अनंत कळसे**
**मुंबई.** **प्रधान सचिव,**
**महाराष्ट्र विधानसभा**

---

मुद्रणपूर्व सर्व प्रकिया महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालयाच्या संगणक यंत्रणेवर
मुद्रण: शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई.